**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री किसान सन्मान निधी, म्हणजे शेतकऱ्यांच्या कल्याणाप्रति सरकारच्या वचनबद्धतेचा वस्तुपाठ असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन; वाराणसी इथं २ हजार २०० कोटी रुपये खर्चाच्या विकासकामांचं उदघाटन आणि लोकार्पण

- संविधानानं सर्वांना समान संधी देणारी व्यवस्था तयार केल्याचं मुख्यमंत्र्यांचं नागपूरमधे प्रतिपादन

- उद्योगांना जमिनी द्याव्याच लॉगल्या तर त्या उद्योगात भागिदार म्हणून घेण्याबाबत ठामपणे सांगा असं मनसे प्रमुख राज ठाकरे यांचं जनतेला आवाहन

**आणि**

- इंग्लडविरोधातल्या पाचव्या कसोटी क्रिकेट सामन्याच्या दुसऱ्या डावात भारताच्या यशस्वी जयस्वालचं शतक

**<><><><><>**

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी, म्हणजे शेतकऱ्यांच्या कल्याणाप्रति असलेल्या सरकारच्या वचनबद्धतेचा वस्तुपाठ असून, गेल्या दशकभरात शेतकऱ्यांच्या प्रत्येक समस्येचं निराकरण करण्यासाठी सरकारने पूर्ण क्षमतेनं काम केल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते आज उत्तरप्रदेशमध्ये वाराणसी इथं प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा विसावा हप्ता जारी करताना बोलत होते. या हप्त्या मधून देशभरातल्या ९ कोटी ७० लाखांपेक्षा जास्त शेतकऱ्यांच्या बँक खात्यात २१ हजार कोटी रुपये थेट हस्तांतरित केले जातील.

प्रधानमंत्री मोदी यांनी आज उत्तरप्रदेशमध्ये वाराणसी इथं सुमारे २ हजार २०० कोटी रुपये खर्चाच्या विविध विकास कामांचं उदघाटन आणि पायाभरणी केली. यावेळी त्यांनी 'दिव्यांगजन' आणि वृद्ध लाभार्थ्यांना ७ हजार ४०० सहाय्यक साहित्याचं वितरण केलं. त्यानंतर त्यांनी जनसभेला संबोधित केलं.

सणासुदीच्या काळात स्थानिक उत्पादनांना प्राधान्य देऊन ‘व्होकल फॉर लोकल’ला पाठबळ देण्याचं आवाहन त्यांनी यावेळी केलं.

**‘होल्ड बाईट’**

यावेळी प्रधानमंत्र्यांनी अनेक पायाभूत सुविधा प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणीही केली.

पी एम किसान सन्मान निधी योजनेचा विसावा हप्ता आज जारी झाला. त्या निमित्ताने राज्यभरात विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

पीएम किसान सन्मान योजना छोट्या आणि अल्प भूधारक शेतकऱ्यांसाठी मोठी लाभदायक ठरल्याचं केंद्रीय सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण राज्यमंत्री रामदास आठवले यांनी आज मुंबईत सांगितलं. या उपक्रमाने शेतकऱ्यांना अधिक स्वावलंबी बनवल्याचं ते यावेळी म्हणाले.

केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे, मुरलीधर मोहोळ आणि प्रतापराव जाधव हे देखील आज किसान सन्मान निधी योजनेच्या विसाव्या हप्त्याचं वितरण झाल्या निमित्त जळगाव, मालेगाव आणि बुलढाणा इथं झालेल्या कार्यक्रमांमध्ये सहभागी झाले.

**<><><><><>**

भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी राष्ट्राला दिलेल्या संविधानानं देशात समतेचं राज्य निर्माण करण्यासह, सर्वांना समान संधी आणि प्रत्येक व्यक्तीच्या स्वप्नपूर्तीसाठी व्यवस्था तयार करण्याचं काम केलं, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. नागपूर इथल्या डॉ आंबेडकर महाविद्यालयाच्या हीरक महोत्सवी सोहळ्यात ते आज बोलत होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला वारसा पुढे नेण्याचं कार्य हे महाविद्यालयानं सातत्यानं करत असून ६ हजाराहून अधिक विद्यार्थी असलेल्या या

महाविद्यालयानं हजारो वंचित विद्यार्थ्यांच्या जीवनात परिवर्तन घडवलं आहे, असं मुख्यमंत्री म्हणाले.

**---बाईट--- देवेंद्र फडणवीस , मुख्यमंत्री.**

या कार्यक्रमाला सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई देखील उपस्थित होते. काही खोल्यांमध्ये सुरु झालेल्या या महाविद्यालयात आज विविध शाखांचं शिक्षण दिलं जात असल्याबद्दल न्यायमूर्ती भूषण गवई यांनी आनंद व्यक्त केला. बाबासाहेबांनी दिलेला सामाजिक आणि आर्थिक न्यायाचा संदेश आचरणात आण्याची गरज असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

ग्रँडमास्टर दिव्या देशमुखनं बुद्धिबळ या खेळातलं चीनचं वर्चस्व मोडीत काढलं याबद्दल एक भारतीय म्हणून तिचा अभिमान वाटत असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. फिडे विश्वचषक महिला बुद्धिबळ विजेती दिव्या देशमुख हिचा आज नागपूर मध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते नागरी सत्कार करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते. तीन कोटी रुपयांचा धनादेश, स्मृती चिन्ह, प्रशस्तीपत्र असं या पुरस्काराचं स्वरूप आहे. यावेळी चेस असोसिएशनतर्फेही दिव्या देशमुख ला ११ लाख रुपयांचा धनादेश देण्यात आला.

**<><><><><>**

उद्योगांना जमिनी विकू नका, आमच्या जमिनी घ्यायच्याच असतील तर आम्हाला उद्योगात पार्टनर म्हणून घेण्याबाबत ठामपणे सांगा, असं आवाहन मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी केलं आहे. ते आज रायगड जिल्ह्यात शेतकरी कामगार पक्षाच्या ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित मेळाव्यात बोलत होते. भाषा आणि जमिनी जपल्या पाहिजेत, एकदा तुमची भाषा आणि जमीन गेली की तुम्हाला जगाच्या पाठीवर कुठेही स्थान नाही असं ते म्हणाले. सरकारच्या हिंदी सक्तीच्या

निर्णयावर तसंच जनसुरक्षा कायद्यावर ठाकरे यांनी जोरदार टीका केली. मराठी माणसाच्या थडग्यावर उदयोग उभे रहायला देणार नाही असं त्यांनी सांगितलं.

राजकारण मराठी माणसांच्या हाती रहावं, कष्टकरी, शेतकरी वर्गाला न्याय मिळावा यासाठी आपण एकत्र आलं पाहिजे असं आवाहन शिवसेना नेते खासदार संजय राऊत यांनी केलं.

तर, सध्याचे राज्यकर्ते लोकशाही नष्ट करत असून त्यांना विरोध करण्यासाठी सर्व पुरोगामी शक्तींची भक्कम एकजूट करण्याची गरज शेकापचे सरचिटणीस जयंत पाटील यांनी व्यक्त केली.

<><><><><>

सातपुडा पर्वतरांगेच्या कुशीत वसलेल्या जळगाव जिल्ह्यातल्या पाल अभयारण्यात आज जळगावचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या हस्ते जंगल सफारीचं उद्घाटन झालं. सातपुडा जंगल सफारी हा ग्रामीण विकास आणि पर्यावरण संवर्धनाचा अभिनव संकल्प असून जैवविविधतेचं संवर्धन, स्थानिक रोजगार आणि पर्यावरण पर्यटनासाठी जंगल सफारी महत्त्वाचा टप्पा ठरेल असं, गुलाबराव पाटील यावेळी म्हणाले. जंगल सफारीचा पहिला टप्पा सुमारे अडीच कोटी रुपये निधीतून पूर्ण करण्यात आला आहे.

<><><><><>

रत्नागिरी पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेनं सापळा रचून केलेल्या कारवाईत अडीच किलो वजनाची, अडीच कोटी रुपये किमतीची व्हेल माशाची उलटी जप्त केली आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक नितीन बगाटे यांनी आज पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. या पदार्थाची विक्री करण्याच्या आरोपाखाली एका व्यक्तीला पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे.

<><><><><>

समरसता साहित्य संमेलनाला आज नांदेडमध्ये भव्य ग्रंथदिंडीनं प्रारंभ झाला. साहित्य संमेलनाचे अध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक पद्मश्री नामदेव कांबळे, संमेलनाचे उद्घाटक तथा समरसता साहित्य परिषदेचे संस्थापक सदस्य प्राध्यापक रमेश महाजन आणि मान्यवर तसंच साहित्यरसिक यावेळी उपस्थित होते. समरसता साहित्य संमेलनामधून सामाजिक समस्येसाठी आवश्यक असणाऱ्या साहित्याचा अनुबंध निर्माण होईल, असा विश्वास नामदेव कांबळे यांनी व्यक्त केला.

<><><><><>

जळगाव इथं आज केंद्रीय युवक कल्याण आणि क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्या हस्ते ११ वर्षांखालील मुलामुलींच्या ३८ व्या राष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धेला मोठ्या उत्साहात सुरुवात झाली. देशातल्या उदयोन्मुख बुद्धिबळपटूंना हेरून त्यांना प्रशिक्षण देण्यासाठी हा कार्यक्रम म्हणजे एक महत्त्वाचं व्यासपीठ मानलं जातं. देशभरातून ५०० पेक्षा अधिक खेळाडू स्पर्धेत सहभागी झाले आहेत. या स्पर्धेत एकूण ११ झाल्या आहेत.आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ महासंघाने आखलेल्या नियमावलीनुसार ही स्पर्धा होणार आहे.

<><><><><>

भारताला सी-२९५ लष्करी वाहतूक विमानांमधली शेवटची १६ विमानं प्राप्त झाली असून त्यामुळे भारताची संरक्षण क्षमता आणखी मजबूत झाली आहे. स्पेनमध्ये सेव्हील इथं भारताचे राजदूत दिनेश पटनाईक आणि भारतीय हवाईदलाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत हे हस्तांतरण झालं. नियमित वेळापत्रकाच्या दोन महिने आधी विमानं प्राप्त झाली आहेत. भारत आणि स्पेनमध्ये झालेल्या करारानुसार एकूण ५६ विमानं भारताला मिळणार आहेत.

<><><><><>

अँडरसन-तेंडुलकर कसोटी क्रिकेट मालिकेतल्या पाचव्या आणि अखेरच्या सामन्यात आज तिसऱ्या दिवसाचा खेळ सुरू आहे.

भारतानं आज आपला दुसरा डाव कालच्या २ बाद ७५ धावसंख्येवरुन पुढे सुरू केला. काल नाबाद असलेल्या यशस्वी जयस्वाल यानं शतकी, तर नाईट वॉचमन आकाशदीप यानं अर्धशतकी खेळी केली. या दोघांनी तिसऱ्या गड्यासाठी १०७ धावांची भागिदारी केली. आकाशदीपनं ६६ धावा केल्या. त्यानंतर फलंदाजीसाठी आलेला कर्णधार शुभन गील मात्र केवळ ११ धावा करून बाद झाला.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा भारतानं दुसऱ्या डावात ५ गडी बाद २३० धावा केल्या होत्या. आणि भारताची आघाडी २०७ धावांवर पोहोचली होती.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसांत कोकणात बऱ्याच ठिकाणी, तर मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडेल असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**//<><><><><>//**